# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

## कंत्राटी तत्वावर पदे भरण्याबाबतची जाहिरात

**जाहिरात क्रमांक : रातुमनावि/सा.प्र./१२२७** **दिनांक : २५ नोव्हेंबर, २०२०**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात **कंत्राटी पद्धतीवर, तात्पुरत्या स्वरूपात, ११ महिन्याच्या कालावधीकरीता** खालील पदे भरावयाची आहेत.

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | दरमहा वेतन |
|---|---|---|---|
| १. | विधी अधिकारी | ०१ | रू.३०,०००/- |
| २. | जनसंपर्क अधिकारी | ०१ | रू.२४,०००/- |

याकरीता, पात्र उमेदवारांकडून आवेदनपत्र मागविण्यात येत आहेत.

वरील पदांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय व पात्रतेच्या इतर निकषासंबंधीची विस्तृत माहिती आणि अर्जाचा विहित नमुना विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे.

इच्छुक अर्जदारांनी जाहिरातीत नमूद सर्वसाधारण सुचनांचे लक्षपूर्वक वाचन करून व पात्रतेच्या अटींची पूर्तता करीत असल्याची खात्री करून विहित नमुन्यात माहिती भरून आवश्यक सहपत्रांसह एकूण **सहा प्रतीत** आपला अर्ज विद्यापीठात **दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** सादर करावा.

## जाहिरातीमधील पदांच्या पात्रतेचे निकष

| अ. क्र. | पदनाम | आवश्यक शैक्षणिक अर्हता, अनुभव व इतर निकष |
|---|---|---|
| १. | **विधी अधिकारी** | मान्यताप्राप्त विद्यापीठाची एलएल.एम. पदवी किमान द्वितीय श्रेणीत (सरासरी ५० टक्के) उत्तीर्ण आणि तसेच, शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये कायदा अधिकारी वा तत्सम म्हणून काम केल्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव किंवा जिल्हा न्यायालयात वकिली केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>***- अथवा -***<br>मान्यताप्राप्त विद्यापीठाची एलएल.बी. पदवी किमान द्वितीय श्रेणीत (५० टक्के) उत्तीर्ण आणि तसेच, शैक्षणिक / औद्योगिक / शासकीय किंवा निमशासकीय संस्थेमध्ये कायदा अधिकारी वा तत्सम म्हणून काम केल्याचा किमान पाच वर्षाचा अनुभव किंवा उच्च न्यायालयात वकीली केल्याचा किमान सात वर्षाचा अनुभव.<br>**वयोमर्यादा :-**<br>सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा २८ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

| | | |
|---|---|---|
| २. | जनसंपर्क अधिकारी | १. मान्यताप्राप्त विद्यापीठाची मास कम्यूनिकेशन / जर्नालिझम / पब्लिक रिलेशन किंवा समकक्ष विषयातील पदव्युत्तर पदवी किमान द्वितीय श्रेणीत (५० टक्के) उत्तीर्ण.<br>२. प्रसारमाध्यमामधील (उपसंपादक दर्जापेक्षा कमी नसावा) / शासन मान्यताप्राप्त संस्थेमधील संपादकीय कामाचा अथवा जनसंपर्क अधिकारी पदाचा किमान पाच वर्षाचा अनुभव.<br>मराठी, इंग्रजी व हिन्दी या भाषांवर प्रभुत्व आणि लेखन कौशल्य असल्याबाबतचे दाखले / पुरावे.<br>**वयोमर्यादा :-**<br>सर्व उमेदवारांसाठी किमान वयोमर्यादा २६ वर्षे असून खुल्या प्रवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्षे राहील. |

## अर्जदारांसाठी सर्वसाधारण सूचना

उमेदवारांनी आपले अर्ज भरण्यापूर्वी त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, इत्यादी बाबी पडताळून पाहाव्यात. तसेच खालील सूचना व अटींचे लक्षपूर्वक वाचन करावे.

१) **सर्व पदे, कंत्राटी पद्धतीवर, तात्पुरत्या स्वरूपात, ११ महिन्याच्या कालावधीकरिता भरावयाची आहेत.**

२) सर्व पदांसाठी, पात्र ठरणाऱ्या उमेदवारास **मराठी भाषेचे ज्ञान** असणे आवश्यक आहे.

३) प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज करावा.

४) आवेदकांनी विद्यापीठाच्या **www.nagpuruniversity.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्येच टंकलिखित, हस्तलिखित किंवा संगणकीय प्रिंट केलेला अर्ज **(परिपूर्ण भरलेला अर्जाचा नमुना व संबंधित प्रमाणपत्रांच्या स्वसाक्षांकित प्रती)** एकूण **सहा प्रतीत** सादर करावा. विहित नमुन्यातील अनुक्रमांकामध्ये/रकान्यामध्ये कुठलाही बदल करू नये. अर्ज भरतांना रकाने किंवा ओळी कमी पडत असल्यास अधिकची माहिती स्वतंत्र कागदावर द्यावी व तसे अर्जात योग्य त्या ठिकाणी नमूद करावे. **अर्जदाराने आवेदनपत्रातील "प्रपत्र-अ" मध्ये माहिती भरणे अत्यावश्यक आहे. सदर प्रपत्रात माहिती सादर न केल्यास आपल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.**

५) अर्जदाराने अर्जाच्या **किमान दोन प्रतीत** विहित नमुन्यात दर्शविलेल्या स्थानी स्वतःचा स्वसाक्षांकित केलेला फोटो चिटकवावा.

६) पात्र ठरणाऱ्या उमेदवारास मुलाखतीसाठी स्वतंत्रपणे पत्रव्यवहार केला जाईल.

७) मुलाखतीस उपस्थित राहतेवेळी उमेदवाराने सर्व आवश्यक व संबंधित प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती सोबत आणणे आश्यक आहे. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे संलग्नित करू नयेत.**

८) अर्जासोबत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक अनुभव, वय, जात, जातवैधता, इत्यादी संबंधी आवश्यक प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती जोडाव्यात. **अर्जासोबत मुळ प्रमाणपत्रे जोडू नयेत.**

९) प्रत्येक पदासाठी केलेला अर्ज सर्व दस्तावेजांसह वेगवेगळया लिफाफ्यात भरून ------------------ **या पदासाठी अर्ज** असे लिफाफ्यावर लिहून **"मा. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, जमनालाल बजाज प्रशासकीय भवन, महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परीसर, विद्यापीठ कॅम्पस चौक ते अंबाझरी वळण मार्ग, नागपूर -४४० ०३३"** या पत्त्यावर **दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सायं ५.०० वाजेपर्यंत** पोहचेल अशा बेताने पाठवावे. यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा कुठल्याही परिस्थितीत विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

१०) सुवाच्च्य अक्षरात नसलेले, अपूर्ण, चुकीची माहिती भरलेले, विहित नमुन्यात नसलेले, आवश्यक शैक्षणिक अहर्ता व अनुभव धारण करीत नसलेले, वयोमर्यादेत मोडत नसलेले, अर्जासोबत आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या छायांकित व स्वसाक्षांकित प्रती नसलेले, टपालखात्याच्या दिरंगाईमुळे अथवा अन्य कोणत्याही कारणास्तव उशीरा प्राप्त झालेले, इत्यादी त्रुटी असलेले अर्ज तसेच सर्व प्रमाणपत्रांसह सहा प्रतींमध्ये नसलेले अर्ज अवैध ठरविल्या जातील व विचारात घेतल्या जाणार नाही आणि त्याबाबतीत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

**११) अर्जदाराने आवश्यक असलेली शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक अनुभव व वय हे अर्ज सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत धारण केलेले असावे.**

१२) ई-मेल किंवा फॅक्सद्वारे प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

१३) अर्जाच्या छाननीअंती अर्जदार अपात्र ठरल्यास याबाबतची माहिती संबंधित अर्जदारास स्वतंत्ररित्या कळविली जाणार नाही.

१४) उमेदवारांनी भरती प्रक्रियेत विद्यापीठाशी संबंधित अधिकारी व सेवकांवर कोणत्याही प्रकारचे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष दडपण तथा राजकीय किंवा सामाजिक दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास अथवा अप्रत्यक्ष संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास, अशा उमेदवारांस अपात्र ठरविल्या जाईल.

१५) मुलाखतीस बोलाविलेल्या अर्जदारांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

१६) विद्यापीठ प्रशासनाद्वारे आयोजित मुलाखतीस पाचारण करण्यात येणाऱ्या संबंधीत उमेदवाराची ठराविक दिवशी प्रशासनाच्या कोणत्याही अडचणीमुळे मुलाखत पार न पडल्यास अशा संबंधीत उमेदवारांची प्रशासनाच्या निर्देशान्वये इतर दिवशी मुलाखत आयोजित करण्यात येईल व त्याकरिता मुलाखतीस संबंधीत उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१७) निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीउपरांत उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे सादर केल्याचे किंवा माहिती लपवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची निवड/नियुक्ति तात्काळ रद्द करण्यात येईल व असा उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

१८) जाहिरातीत बदल किंवा दुरूस्ती करण्याबाबत, तसेच संपूर्ण जाहिरात रद्द करण्याबाबतचे अधिकार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने राखून ठेवले आहे.

१९) सर्व वाद नागपूरातील सक्षम न्यायालयाच्या अखत्यारीत राहतील.

**कुलसचिव**
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज
नागपूर विद्यापीठ

***◉***